**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**मंगल कार्यालय**

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
**सौभाग्य मंगल कार्यालय**
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २४६ वा | सोमवार, दि. १२ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# आता गोळी नाही तर भारताकडून गोळा चालणार

## आम्हाला कोणत्याही मध्यस्थीची गरज नाही

## पाकव्याप्त काश्मीर याच मुद्द्यावर पाकिस्तानशी चर्चा होऊ शकते




**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** भारत-पाकिस्तानमध्ये सलग 86 तास युद्ध चालल्यानंतर अखेर युद्धबंदीची घोषणा करण्यात आलीयं. या घोषणेनंतरही पाकिस्तानकडून अद्यापही कुरापती सुरुच असल्याचं चित्र पाहाला मिळत आहे.

अशातच आता भारताकडून एक मोठी घोषणा करण्यात आलीयं. पाकिस्तानातून जर गोळी चालली तर भारतातून गोळे चालणार असल्याचं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला ललकारलंय. मागील आठवडाभरातील तिसरी उच्चस्तरीय बैठक आज पार पडली. या बैठकीनंतर पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला ललकारलंय.

पुढे बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, पाकिस्तान जर दहशतवाद्यांना आमच्या ताब्यात देणार असतील तर आम्ही पुढील चर्चा करण्यास तयार आहे. आम्ही दुसऱ्या कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास तयार नाही. आम्हाला कोणाच्याही मध्यस्थीची गरज नसल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्पष्ट केलंय. एएनआय वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे.डी. वेंस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारत-पाकिस्तान युद्धासंदर्भात चर्चा झालीयं. या चर्चेत पंतप्रधान मोदींनी वेंस यांना आपली भूमिका समजावून सांगितली आहे. जर पाकिस्तान काही कुरापती करीत असेल तर भारत त्यांना चोख प्रत्युत्तर देईल.

तसेच ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेलं नाही, पाकिस्तानातून जर गोळी चालली तर भारतातून गोळे चालणार असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्पष्ट केलंय. दरम्यान, सुत्रांच्या माहितीनुसार दोन्ही देशांच्या एनएसए आणि विदेश मंत्र्यांमध्ये कोणत्याही प्रकारची चर्चा झालेली नाही. फक्त पाकिस्तानच्या डीजीएमओने भारताच्या डीजीएमओसोबत चर्चा केली होती.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांन भारत पाकिस्तान यांच्यातील वादग्रस्त काश्मीर मुद्द्यात मध्यस्थीची तयार दर्शवली. परंतू भारत सरकारने आज आपली भूमिका स्पष्ट केलीयं. आम्हाला कोणत्याही मध्यस्थीची गरज नाही. पाकव्याप्त काश्मीर याच मुद्द्यावर पाकिस्तानशी चर्चा होऊ शकते, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

7 मे रोजी ऑपरेशन सिंदूर सुरू झालं होतं. त्यानंतर 86 तासांत युद्धबंदीची घोषणा, आणि आता पुन्हा ऑपरेशन सिंदूर सुरूच असल्याचं वृत्त समोर येतंय. ऑपरेशन सिंदूर अजून संपलेलं नाही, अशी माहिती भारतीय हवाई दलाने दिली आहे. पंतप्रधानांच्या निवासस्थानी एक हायलेवल बैठक झालीय. या मिटिंगमध्ये तिन्ही सेनाप्रमुख, सीडीएस, एनएसए आणि संरक्षण मंत्री उपस्थित होते. या बैठकीत नेमके कोणती खलबतं झाली, यासंदर्भात अजून कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. परंतु या बैठकीनंतर भारताई हवाई दलाने एक ट्विटर पोस्ट केली आहे.

या ट्विटमध्ये म्हटलंय की, भारतीय हवाई दलाने ऑपरेशन सिंदूरमध्ये नेमून दिलेली कामे अचूकतेने यशस्वीरित्या पार पाडली आहेत. ऑपरेशन राष्ट्रीय उद्दिष्टांशी सुसंगत, जाणीवपूर्वक आणि सावधगिरीने पार पाडण्यात आले. ऑपरेशन्स अजूनही सुरूच आहे. योग्य वेळी सविस्तर माहिती दिली जाईल. सर्वांना खोटी माहिती प्रसारित करण्यापासून दूर राहण्याचे आवाहन, भारतीय हवाई दलाने केलं आहे. हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, ऑपरेशन सिंदूर संपलेलं नाहीये. खरं तर ऑपरेशन सिंदूरचा हेतू दहशतवाद्यांच्या स्थानांवर हल्ला करणे, दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करणे, असा आहे.

(पान 2 वर..)

## तरुणाईने नोकरीपेक्षा व्यवसायाकडे वळावे - खा. धैर्यशील मोहिते पाटील

### मराठा सेवा संघाच्या वतीने महाअधिवेशन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ३५ वर्षात मराठा सेवा संघाने वैचारिक व पुस्तकांच्या माध्यमातून मराठा समाजास धाडसाने जुन्या रूढी-परंपरातून बाहेर काढण्याचे कार्य करून समाजाला सातत्याने दिशा देण्याचे काम केले असून तत्कालीन परिस्थिती व आजच्या परिस्थितीत मोठा बदल झाल्यामुळे आज तरुणाईला विचारमंथनातून नोकरीपेक्षा व्यवसायाकडे वळविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, अशी अपेक्षा खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केली.

शंकरनगर येथील स्मृतिभवनात मराठा सेवा संघाच्या वतीने १० ते १२ मे २०२५ दरम्यान तीन दिवसीय महाअधिवेशन अयोजित करण्यात आले असून अधिवेशनाच्या उद्घाटनाप्रसंगी खासदार धैर्यशील मोहिते पाटील बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते (पान 2 वर..)



**पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली**

पहलगाम येथील अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यात बळी पडलेल्या भारतीय नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शाहीर राजेंद्र कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाड्याचा कार्यक्रम सादर केला व महाराणी येसूबाई यांच्या जीवनावर आशा मोरजकर यांनी एकपात्री "श्री राज्ञी सखी जयति" प्रयोग सादर केला. सायंकाळी माळशिरस तालुका जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने संस्कृती यात्रा काढण्यात येऊन जागर विचारांचा, जागर संस्कृतीचा या सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिल्या दिवसाची सांगता झाली.

## सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी दिलीप माने यांची निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी कॉंग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांची निवड करण्यात आली आहे.

तर उपसभापती पदी भाजप नेते सुनील कळके यांची निवड झाली आहे. सभापती आणि उपसभापती दोन्ही पदासाठी एक-एक अर्ज आल्याने दोन्ही निवड बिनविरोध जाहीर करण्यात आली आहे.

**दोन वर्षांसाठी दिलीप माने यांच्याकडे राहणार सभापतीपद**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी विरुद्ध आमदार सुभाष देशमुख यांच्या पॅनलमध्ये थेट लढाई झाली होती. या लढतीत आमदार सचिन कल्याणशेट्टी गटाचा एकतर्फी विजय झाला होता. त्यानंतर बाजार समितीच्या सभापतीपदी कोणाची निवड होणार याचीच चर्चा मोठ्या प्रमाणात सुरु होती. आज झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत माजी आमदार दिलीप माने सभापती पदी आणि भाजप नेते सुनील कळके यांची उपसभापती पदी निवड जाहीर करण्यात आली. सभापती आणि उपसभापतींची निवड होताच भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. यावेळी दिलीप माने आणि सुनील कळके समर्थकांनी मोठा जल्लोष केलाय.

**दिलीप मानेंकडून देवेंद्र फडणवीस यांच्यासह**

**कल्याणशेट्टींचे आभार**

सभापती निवड झाल्यानंतर दिलीप माने म्हणाले, सचिन कल्याणशेट्टी यांनी हे पॅनेल उभा करुन निवडून आणलं. माझी निवड करण्यासाठी सर्वांना विश्वासात घेतलं. सभापतीपदाचा मान मला सचिनदादांनी दिला. आदरणीय मुख्यमंत्र्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला. निश्चितपणे मी शेतकरी, व्यापाऱ्यांसाठी मी चांगल काम करेन. ह निवडणुकीच्या नियोजनचा भाग आहे, मिलीभगत नाही. मला दोन वर्षे आणि हसापुरे साहेबांना (पान 2 वर..)







**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**


## तुम्ही माणसं असून रुग्णांना जनावरासारखी वागणूक का देताय ?

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** तुम्ही अधिकारी आणि कर्मचारी माणसंच आहात मग रुग्णालयातील गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्णांना जनावरांसारखी वागणूक का देताय ? इथे स्वच्छता आणि पाण्याची सोय नसेल तर तुम्ही उपचार तर नक्की काय करताय ? इमारतीमधील ठीकठाकांची अस्वच्छता आणि जाळी तुमच्या अकार्यक्षम कारभाराची साक्ष देत आहे तर तुम्ही रुग्णांवर चांगले उपचार करून त्यांच्या जीविताचे रक्षण कसे करणार ? असा संतप्त सवाल सोलापूरच्या खासदार प्रणितीताई शिंदे यांनी शनिवारी दुपारी एक वाजता मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयाला अचानक भेट दिल्यानंतर व्यक्त केला.



सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या आणि तब्बल सहा राष्ट्रीय महामार्ग गेलेल्या मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांची विविध सोयी सुविधांच्या अभावामुळे होत असलेली हेळसांड होत होती. ही अतिशय गंभीर आणि आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेली बाब कानावर गेल्यामुळे सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणितीताई शिंदे यांनी आज अचानक मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन स्थानिक नागरिक आणि रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांशी संवाद साधला.

यावेळी ग्रामीण रुग्णालयातील विविध विभागातील अस्वच्छता, अस्ताव्यस्तता, पिण्याच्या पाण्याची नसलेली सोय रुग्णांना त्याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका होऊ शकणारे उघड्या वायरिंगबाबत नाराजी व्यक्त केली. रुग्णालयाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या ओटी म्हणजे ऑपरेशन थिएटरचा बंद असलेला कुलूपबंद दरवाजा उघडायला लावला. तेथील घाणीचे साम्राज्य पाहून रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे याबाबत नाराजी व्यक्त करत स्वच्छता कर्मचाऱ्यांच्य बेजाबाबदारपणाचा जाब विचारला.

अनुपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांची त्वरित हकालपट्टी करून दक्ष कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या सूचना यांनी त्यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरून बोलताना दिल्या. त्याचबरोबर पुढील आठवड्यात आवर्जून पुन्हा एकदा या रुग्णालयाला भेट देऊन स्वच्छता आणि अन्य बाबीं बाबत उपायोजना झाल्या की नाही हे तपासून पाहणार असल्याचे त्यांनी सांगीतले.या ठिकाणी स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबद्दल त्वरित वरिष्ठांकडे कारवाईचा प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना वैद्यकीय अधिकारी बाबर यांना दिल्या. त्याचबरोबर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची लेखी माहिती उपलब्ध नसल्याबद्दल जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने यांच्याशी संपर्क साधत मोहोळ ग्रामीण रुग्णालयाबाबतच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली. येथील रुग्णालयातील अंतर्गत वायरिंग उघड्यावर असलेले पाहून त्याचबरोबर फिटिंगची अवस्था पाहून मोहोळ येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी भ्रमणध्वनीवरून फैलावर घेतले. याबाबत त्यांनी त्वरित मोहोळ महावितरण मधील प्रभारी अधिकारी (पान 2 वर..)









## संपादकीय

# शिष्यवृत्ती विलंबाचा परिणाम

सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून वेगवेगळ्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे या दृष्टिकोनातून मॅट्रिक्युलेशन शिष्यवृत्ती भारत सरकार आणि राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती समाजकल्याण विभागाकडून वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. अगदी अकरावीपासून ते वेगवेगळ्या प्रोफेशनल कोर्सेसलासुद्धा शिष्यवृत्ती दिली जाते. अर्थात, त्या कोर्ससाठी असणारी संपूर्ण फीस आणि त्या विद्यार्थ्याला वेगवेगळ्या भत्याच्या माध्यमातून दिली जाणारी रक्कम हेही त्यामध्ये सामावण्याचा प्रयत्न केलेला असतो.

अलीकडे दोन-तीन वर्षापासून विशेषतः प्रोफेशनल कोर्सेससाठी दिली जाणारी शिष्यवृत्ती वेळेवर त्या विद्यार्थ्यांना मिळत नाही आणि त्यामुळे महाविद्यालयाची किंवा त्या शिक्षण संस्थेची फीस न भरल्यामुळे संबंधित संस्थासुद्धा आर्थिक अडचणीमध्ये असल्याचे दिसून येते. मग विद्यार्थी, पालक आणि संबंधित संस्था यामध्ये एक संघर्ष उभा राहतो. त्याचं कारण म्हणजे शासनाकडून होत असलेला शिष्यवृत्ती देण्यासाठीचा विलंब. त्यामध्ये विद्यार्थी किंवा शिक्षण संस्था यांचं काहीही चुकत नसताना फक्त शासनाकडून होत असलेल्या विलंबामुळे या सगळ्या गोष्टी घडायला कारणीभूत ठरतात. त्याचबरोबर गोरगरीब मागासवर्गीय विद्यार्थी या विलंबामुळे मानसिक दृष्टिकोनातून कमकुवत बनायला लागतो. त्याला त्यांचं मन खायला उठते आणि त्यामध्येच संबंधित महाविद्यालय किंवा संस्था यांच्याकडून फीस भरण्यासंदर्भात लावलेला तगादा यामुळे तो हैराण होतो.

अलीकडच्या काळात असं निदर्शनात येऊ लागलं की आपण आपल्या महाराष्ट्राचे उदाहरण जर घेतले तर 'लाडकी बहीण' 'लाडका भाऊ' अशा पैसे वाटण्याच्या योजना महाराष्ट्र शासनाकडून निवडणुकीच्या काळापासून राबविल्या जात आहेत. त्याचा फटका समाजकल्याण विभागाकडून, सामाजिक न्याय विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी ज्या काही योजना राबविल्या जातात त्यांचा निधी या योजनांकडे वळविला जातो. त्यामुळे ज्या खर्‍या योजनांसाठी संबंधित आर्थिक नियोजन करून ठेवलेले असते ते कुठेतरी ढासळते आणि अनेक अडचणी निर्माण होतात. त्यापैकीच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती या विलंबाने मिळत आहेत. अनेक मेडिकल, इंजिनिअरिंग, फार्मसी, व्यवस्थापन, शास्त्र आणि इतर प्रोफेशनल, ॲकॅडमिक कॉलेजमध्ये विद्यार्थी खूप विवंचनेत वावरत आहेत; परंतु त्यांचं सत्ताधार्‍यांना, राजकारण्यांना, महाराष्ट्र प्रशासनाला काहीही देणे घेणे नाही असं वाटतं.

एक लक्षात घ्या की आपल्याकडे 1 एप्रिल ते 31 मार्च या कालावधीमध्ये आर्थिक वर्ष गणलं जातं. त्यानुसार विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती दिल्या जातात. परंतु अलीकडच्या काळात वर्ष संपून गेलं तरी शिष्यवृत्ती मिळत नाही. का मिळत नाही याची चौकशी समाजकल्याण विभागाकडे जाऊन विद्यार्थी करत आहेत तसेच संस्थाही करत आहेत. त्यावेळेस त्यांना एक गोंडस कारण दिलं जातं की शासनाचा निधी अजून उपलब्ध झालेला नाही. मग जर शासनाला योग्य वेळेत या सगळ्या शिष्यवृत्तीच्या योजनांना पैसा पुरवायचा नसेल तर मग या योजना का काढल्या जातात. का विद्यार्थ्यांना, पालकांना त्रास दिला जातो.

नुकतीच वर्तमानपत्रांमध्ये आलेली बातमी अशा मथळ्याखाली होती की "समाजकल्याण विभागाचा साडेचारशे कोटी रुपयांचा निधी लाडक्या बहिणींच्या योजनेसाठी वळविला". अशा प्रकारचे चित्र आपणाला दिसत असेल तर गोरगरीब मागासवर्गीयांच्या योजनांना कुठेतरी काटी आणण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांकडून केला जातो आहे काय, हा प्रश्न सर्वसामान्यांसमोर उभा राहतोय.

एक लक्षात घ्या विद्यार्थी हा शिक्षण घेणारा असतो. शासनाने काही कालावधीपूर्वी मुलींच्या मोफत शिक्षणाची घोषणा केली होती; परंतु त्या घोषणेप्रमाणे आजही विद्यार्थिनींना मोफत शिक्षण दिले जाते काय, यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मुळात मागासवर्गीयांची शिष्यवृत्ती देण्यासाठी हा विचार करायला हवा की केंद्र शासनाकडून काही निधी आणि राज्य शासनाचा काही निधी असे मिळून ते सर्व शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देत असतात मग शासनाने हे लक्षात घेतलं पाहिजे की ज्यावेळेस विद्यार्थी त्या ठिकाणी प्रवेश घेतो प्रवेश घेतल्यानंतर एक ते दोन महिन्याच्या आत विद्यार्थ्यांने रीतसर शिष्यवृत्तीचा फॉर्म भरला गेला पाहिजे आणि फॉर्म भरल्यापासून एक महिन्याच्या आत जी काही ज्या अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती असेल ती शिष्यवृत्ती ते महाविद्यालय आणि तो विद्यार्थी यांच्या खात्यावर जमा झाली पाहिजे तरच संबंधित विद्यार्थी आपला अभ्यासक्रम पूर्ण करू शकेल.

महाराष्ट्र शासनाने समाजकल्याण विभागाच्या किंवा सामाजिक न्याय विभागाच्या कोणत्याही योजनेचा निधी इतर विभागासाठी वर्ग करू नये. जेणेकरून सर्वच मागासवर्गीयांना योग्य तो न्याय मिळेल. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वेळेवर मिळाली आणि विद्यार्थ्यांना होणारा मानसिक त्रास दूर होईल. तसेच शिक्षणसंस्थांना येणाऱ्या अडचणी सुटण्याचा प्रयत्न होईल. त्या दृष्टिकोनातून विलंब होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या वेगवेगळ्या शिष्यवृत्ती मार्च महिन्याच्या अगोदरच त्यांच्या खात्यावर जमा व्हाव्यात या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत आणि विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी आधार द्यावा, ही अपेक्षा.

# उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती असते?




वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्ल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षापूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# गौतम बुद्धांना । वंदावे बुद्धीने

ज्ञानोबा-तुकोबांनी ज्या इंद्रायणीच्या प्रवाहातून वैश्विक करुणेचा महापूर महाराष्ट्रभर पसरवला, त्या इंद्रायणीचा उगम तथागताच्या दयाशील, प्रेममय जीवनातून संदेश घेणाऱ्या असंख्य भिक्षूंच्या निवासभूमीत झालेला आहे, हे सत्य दुर्लक्षिता येणार नाही. महाराष्ट्रावरील बुद्धप्रभावाविषयी संशोधक डॉ. ढेरे लिहितात, 'ज्ञानदेव-नामदेव पूर्व हजार दीड हजार वर्षांचा काळ भगवान बुद्धांच्या अहिंसा आणि करुणेच्या महामंत्राने व्यापला होता. भिक्षु हा राजपुरुषांपासून शेतकऱ्यांमार्फत सर्वांच्या आदराचा विषय बनलेला होता. त्या आदराची निदर्शक भिकोबा आणि भिकूबाई ही स्त्री-पुरुषांची नावं खेडोपाडी प्रचलित झाली होती.'

अशा गौतम बुद्धांना दशावतार मालिकेत बसवून हिंदू आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी बुद्धांच्या मालिकेत 'नारसिंह, वामन, परशुराम आदी, नृशंस, शोषणभोगी, हिंसक, क्रूर पुराणपात्रांना बसवणं, हे बुद्धांच्या अहिंसातत्त्वाची हिंसा करण्यासारखं कुटिल कृत्य आहे. डॉ.आ.ह.साळुंखे म्हणतात, 'गौतम बुद्धांना दशावतारात बसवणं, हा एका डावपेचाचा भाग असतो. अर्थात, अशा व्यक्तीला आदरणीय म्हणून स्वीकारत असल्याचं दाखवायचं आणि त्यांचा मूळचा क्रांतिकारकत्व असलेला चेहरा- मोहरा बदलून टाकायचा, तिच्या तोंडी आपलं तत्त्वज्ञान घालायचं असा हा प्रकार असतो. बुद्धांच्या बाबतीत हेच घडवून त्यांचं बुद्धत्व संपवून टाकण्यात आलं.' वस्तुतः तथागत हे मानव म्हणून जन्माला आले आणि आपल्या प्रयत्नाने, विवेकाने बुद्ध बनले. यज्ञसंस्कृती, वेदप्रामाण्य, विषम वर्णव्यवस्था हे सर्व सनातन परंपरेचे दुर्गुण त्यांनी स्पष्टपणे नाकारले होते.

बुद्धपूर्वकाळ हा दुदैर्वाने ईश्वरी सत्ता मानण्याच्या समजुतीने दूषित झाला होता. मानवद्वेष्टा झाला होता. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाने प्रबोधनकाळात माणसाला केंद्रबिंदू मानून विचाराला सुरुवात केली होती. पण ही वैचारिक क्रांती पाश्चात्त्य प्रबोधनातून प्रस्फुटित झाली नव्हती. इ.स.पूर्व पाचशे वर्ष बुद्धांनी माणसाचं जे श्रेष्ठत्वमापन केलं, त्याचे ते जागतिक पडसाद असावेत. माणसाच्या श्रेष्ठत्वाचे वारे गौतम बुद्धांच्या विचारातून प्रवर्तित झाले असतील, यात शंकाच नाही. प्रा.ड्वाइट गोडार्ड म्हणतात, 'जगातल्या सर्व धर्मसंस्थापकांत भगवान बुद्धच फक्त एक असे थोर होते की, जे आपली मुक्ती साध्य करण्याच्या मानवी सामर्थ्याचा स्वाभाविक मोठेपणा बरोबर ओळखू शकले. त्यांनी काल्पनिक ईश्वराला झुगारून देऊन मानवी श्रेष्ठत्व अबाध राखलं.' गौतम बुद्धांचं मानव जातीच्या उन्नयनाचं कार्य त्यांच्या धर्मप्रसारापेक्षाही मोठं आहे. कारण अन्य धर्मांनी मानव हा जन्मतः पापीच असतो किंवा पूर्वजन्माच्या कमार्ने हीन दशा भोगतो, तो ईश्वर-नियती-भाग्य यांच्या स्वाधीन असतो, त्याला स्वतंत्र अस्तित्व नसतं, असं मानण्यातच धन्यता दाखवली.

गौतम बुद्ध केवळ धर्मसंस्थापक नसून ते विश्वधर्म संस्थापक आहेत. मानव जात आज अनेक धर्मांत विभागली गेली असली, तरी निश्चिंत जीवनासाठी जगातील सर्वांना बुद्ध धमार्ला शरण जाणं जमलं नाही; तरी बौद्धविचारांना शरण गेल्याशिवाय जगताच येणार नाही. बुद्ध धर्माच्या त्रिशरणतेत बौद्धतत्त्वं शरणं गच्छामि ही चौथी तत्त्वशरणता आपणा सर्वांना मानावी लागेल. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, 'जगातील पहिला विश्वव्यापक धर्म गौतम बुद्धाने स्थापला. वंश, जाती, राष्ट्र इत्यादी मयार्दा ओलांडून मनुष्यमात्रास शांतीचा आणि सत्य मागार्चा संदेश देण्याची प्रेरणा ही ज्या धर्मात असते तो विश्वधर्म.' बुद्धांनी बौद्ध धर्म स्थापन केला, याचा आनंद हिंदू धर्माच्या पक्षपातीपणाचे घोर विरोधक महात्मा जोतिराव फुले यांनाही वाटतो. ते लिहितात, बुद्धांनी खोड मोडिली, कीर्ती जोडिली सर्व देशात।। बौद्ध धर्म स्थापन करून गौतम बुद्धांनी हिंदू धर्मावर उपकार केले, असं सांगत प्रबोधनकार ठाकरे म्हणतात, 'हिंदू धर्माच्या इतिहासात बौद्ध धर्माच्या स्थापनेचं विशेष महत्त्व आहे. बौद्ध धर्म हे धार्मिक, सामाजिक आणि बौद्धिक गुलामगिरी विरुद्ध बंड आहे. बौद्ध धर्माच्या लोकशाही कर्तबगारीचं ऋण हिंदू धर्मावर फार आहे.'

जगापुढे अज्ञान, दारिद्र्य, हिंसा, वर्णभेद, विषमता आणि क्रौर्ययुक्त धर्मांधता ह्या समस्या मानवजातीचं अस्तित्व संपवू पाहात आहेत. बौद्ध धमार्खेरीज इतर कोणत्याही धर्मामध्ये या समस्यांवरील इलाज नाहीत. डॉ. आंबेडकर म्हणतात, 'मानवी सुधारणा केल्याशिवाय समाजाची सुधारणा होणार नाही. बुद्धिझम शुद्ध लोकशाहीवादी आहे. कम्युनिझम जो जीवनमार्ग दाखवतो त्यापेक्षा बुद्धिझमने दाखवलेला मार्ग अधिक सरस आहे, कारण तो अहिंसा व करुणेने भरलेला आहे.'

गौतम बुद्धांनी आपला शेवटचा संदेश देताना म्हटलं, आळस न करता आपले उद्दिष्ट साध्य करा. डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या मते, बुद्धांचं हे वचन जगण्याची सुंदर वाट दाखवणारं आहे. ते आपल्या काळजात आणि मस्तकात कोरून जपलं पाहिजे. कारण थांबण्यासाठी आपणापाशी वेळ नाही. डॉ.साळुंखे यांनी पुढे आपली धन्यता व्यक्त करताना म्हटलं आहे, सूर्य होता आलं नाही तरी सूर्यफुल व्हावे । मस्तक त्याच्याकडे असावे, त्याच्या आलोकात पहावे।। बुद्ध होता आले नाही, तरी बुद्धफूल व्हावे । हृदय त्याच्याकडे असावे, त्याच्या स्फूर्तीत जगावे।। भारतमातेच्या या सुपुत्राला त्रिवार वंदन करताना म्हणू या-

शुद्ध बुद्धिवादी । शुद्ध नीतिवादी
मानवतावादी । बुद्ध थोर ॥१
चिरंतन सत्य । जीवनी शोधले
स्वगार्ला आणले । भूमिवरी ॥२
शोषकांचे केले । रहस्यभेदन
जागे केले जन । मायाग्रस्त ॥ ३
देव नाकारले । धर्म नाकारला
लोकमानसाला । जागे केले ॥४
जनसामान्यांना । जवळी घेतले
दुःख दूर केले। बापा परी ॥५
विश्वधर्म स्थापी । नव्या युगासाठी
नव्या जगासाठी । प्रेमपूर्ण ॥६
गौतम बुद्धांना वंदावे बुद्धीने
वंदावे मनाने। शतवार ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# आता गोळी नाही तर...

पत्रकार परिषदेत लष्करी ऑपरेशन्सचे महासंचालक राजीव घई यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून 9 दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला करण्यात आला आणि 100 हून अधिक दहशतवादी मारले गेले. यामध्ये कंधार हायजैक आणि पुलवामा हल्ल्यात सहभागी असलेले युसूफ अझहर, अब्दुल मलिक आणि मुदस्सीर अहमद सारख्या दहशतवाद्यांचा समावेश होता. यानंतर सीमेपलीकडून होणाऱ्या पाकिस्तानी गोळीबाराला भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले. प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत भारतीय सैन्याने केवळ नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्याचे 30 ते 40 सैनिक आणि अधिकारी मारले. भारताकडून होणाऱ्या प्रत्युत्तर हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी पाकिस्तानने नागरी विमानांचा वापर ढाल म्हणून केला, परंतु आम्ही कोणत्याही नागरी विमानाला लक्ष्य केले नाही आणि पाकिस्तानमधील लष्करी तळांचेही नुकसान केले.

राजीव घई यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, बहावलपूर आणि मुरीदके येथील दहशतवाद्यांच्या महत्त्वाच्या अड्ड्यांवरही हल्ला करण्यात आला, ज्यामुळे मोठे नुकसान झाले. पाकिस्तानने लहान ड्रोन व यूएव्हीद्वारे आमच्या लष्करी तळांना आणि हवाई पट्ट्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, परंतु आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेने प्रत्येक हल्ला हाणून पाडला. या कारवाईत सुरुवातीला पाकिस्तानी लष्कराचे सैनिक आमचे लक्ष्य नव्हते. आमचे उद्दिष्ट फक्त दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला करणे होते. पण पाकिस्तानने जेव्हा युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि गोळीबार केला, तेव्हा आम्हीही त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. ज्यामध्ये पाकिस्तानी सैन्याचेही मोठे नुकसान झाले. प्रत्युत्तराच्या कारवाई आमचे काम लक्ष्य गाठणे होते, जे आम्ही खूप चांगले केले. आमचे काम मृतदेह मोजणे नाही. परंतु या कारवाईदरम्यान पाकिस्तानने केलेल्या गोळीबारात भारतीय लष्कराचेही पाच जवानही शहीद झाले, अशी माहिती राजीव घई यांनी यांनी दिली.

# पालखी मार्गावरील अपुर्ण कामे तातडीने...

पाटील, मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर, स्वागताध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, आ. उत्तमराव जानकर, शिवतेजसिंह मोहिते पाटील, प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, निर्मलकुमार देशमुख, कामाजी पवार, नेताजी गोरे, नवनाथ घाडगे, अर्जुन तनपुरे, लक्ष्मण महाडिक, सूरज देशमुख, नितीन जाधव, विजयकुमार ठुबे, विलास पाटील, राजेंद्रसिंह पाटील, प्रभाकर झोड, मनोज आखरे, संभाजी पवार, मधुकर मेहेकरे, सीमाताई बोके, मीनाक्षी जगदाळे, उत्तमराव माने, आशाताई माने यांच्यासह सोलापूर जिल्हा, पंढरपूर विभाग व माळशिरस तालुका मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

स्वागताध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून मराठा सेवा संघाची सविस्तर माहिती दिली. उद्घाटनाच्या कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने झाली. सकाळच्या सत्रात मराठा सेवा संघ व ३३ कक्षाचे बळकटीकरण व पुनर्बांधणीसंदर्भात चर्चा झाली, अकलूज इतिहास व विकास हा माहितीपट सादर करण्यात आला.

# सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या...

पुढचे दोन वर्षे असं ठरलेलं आहे. सचिनदादांनी सांगितलं त्याप्रमाणे आमचं नियोजन ठरलेलं आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पॅनलने दणदणीत विजय मिळवला होता. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या श्री. सिद्धेश्वर विकास पॅनलने 18 पैकी 15 जागांवर विजय मिळवला होता. तर भाजप आमदार माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख यांना पुन्हा एकदा पराभवाचा झटका बसलेला पाहायला मिळाला होता. 18 पैकी केवळ 3 जागांवर सुभाष देशमुख यांच्या श्री. सिद्धेश्वर परिवर्तन पॅनलचा विजय झाला होता. निर्णायक असलेल्या विविध कार्यकारी सोसायटी गटातील 11 पैकी 11 जागांवर कल्याणशेट्टी पॅनलचे एकहाती वर्चस्व मिळालं होतं. तर ग्रामपंचायतीतील 4 पैकी 3 जागांवर सुभाष देशमुखांच्या पॅनलने वर्चस्व सिद्ध केले होते.

# अकलूजमध्ये डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी दिला कार्यकर्त्यांना विश्वास

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी, कामगार, कष्टकऱ्यांच्या प्रश्नावर झगडणारी एक सामाजिक संघटना असावी या भावनेतून सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील व लोकनेते (स्व.) प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी जनसेवा संघटनेची स्थापना केली आता या संघटनेला वटवृक्षाचे स्वरूप आले आहे. जनसेवेचे सभासद असणारे अनेक जण आमदार, खासदार झाले मात्र मधल्या काळात संघटनेला मरगळ आली होती.ती आता झटकून पुन्हा सर्वसामान्यांच्या प्रश्नावर आक्रमक होऊन रस्त्यावर उतरेल अस विश्वास डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिला.



अकलूजमध्ये प्रतापगड या निवासस्थानी जनसेवा संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदावरून ते बोलत होते. या वेळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, आक्का साहेब व लोकनेते स्व.प्रतापसिंह मोहिते-पाटील प्रतिमा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.त्यानंतर राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.या वेळी प्रथम पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात जीव गमावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानवर हवाई हल्ले करून चोख प्रत्युत्तर दिले याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अभिनंदनाचा ठराव अण्णासाहेब शिंदे यांनी मांडला. त्यास प्रताप झंजे यांनी अनुमोदन दिले. या वेळी भीमराव बाळगी, शाहीर राजेंद्र कांबळे, अशोक पाटोळे, किशोर जाधव, संग्राम जाधव, विष्णू शिंदे, केशव लोखंडे, विराज खराडे, अभिषेक कांबळे आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पद्मजादेवी मोहिते-पाटील, उर्वशीराजे मोहिते-पाटील, सतीश पालकर, मारुती खटावकर, आण्णासाहेब इनामदार संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून जनसेवा संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बदलत्या राजकीय परिस्थिती बरोबर योग्य वेळी योग्य निर्णय घ्यावा लागेल डॉ.धवलसिंह म्हणाले, बदलत्या राजकीय परिस्थितीबरोबर कुठेतरी आपल्यालाही बदलावे लागणार आहे. मधल्या काळात कोणत्या पक्षाने काय केले याच्या खोलात मी जाणार नाही.योग्य वेळी योग्य निर्णय घ्यावा लागेल. जनशक्तीच्या माध्यमातून जोपर्यंत आपण आपल्या भागात जनतेच्या प्रश्नासाठी उभा राहत नाही तोपर्यंत राजकारण हा विचार थोडा बाजूला ठेवून आपल्याला काम करावे लागेल.

कुठलीही सत्ता नसताना केवळ एका फोनवर एवढी मोठी उपस्थिती म्हणजेच आजही जिल्ह्यातील लोकांचा जनसेवेवर तितकाच विश्वास आहे.या संघटनेच्या माध्यमातून आपण परत एकदा जनसामान्यांच्या प्रश्नासाठी आक्रमकपणे लढू असा शब्द त्यांनी दिला.

# तुम्ही माणसं असून रुग्णांना...

देवकर आणि शहर अभियंता झळकी या अधिकाऱ्यांना ग्रामीण रुग्णालयात बोलावून घेतले आणि आवश्यक त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी नवजात बालकांना देण्यात येणाऱ्या लसीकरण कक्षाची पाहणी केली असता त्यांना धक्काच बसला. त्या ठिकाणी ठीकठिकाणी भिंतीला लागलेली जाळी आणि अस्वच्छता पाहून त्यांचा काहीसा पारा चढला. तुम्ही रुग्णांना अक्षरशा जनावरांसारखी वागणूक देताय असे म्हणत त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना फैलावर घेतले.यावेळी खासदार शिंदे यांनी रुग्णालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशीही संवेदनशीलतेने संवाद साधत तुमच्या देखील अडचणी मांडा, आपण त्या शासन दरबारी मांडून येथील आवश्यक त्या सुविधांसाठी निधी उपलब्ध करून आणू असे म्हणत त्यांच्याही अडचणी जाणून घेतल्या. उपजिल्हा रुग्णालय मंजूर असून यासाठीच्या जागा उपलब्धतेच्या शासकीय नियमाची अडचण अधिकाऱ्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. महाराष्ट्रात काही ठिकाणी दीड एकरात शंभर बेडचे ग्रामीण उपजिल्हा रुग्णालय होत असेल तर मोहोळ मध्ये पन्नास बेडचे दीड एकर जागेत का होत नाही? याबाबत प्रशासकीय स्तरावरून त्वरित निर्णय होऊन नव्या इमारतीचे काम सुरू व्हावे अशी अपेक्षा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी ग्रामीण रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. विदुला बाबर, काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष शाहीन शेख, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, खासदारांचे स्वीय सहाय्यक हाके, शिवसेना नगरसेवक सत्यवान देशमुख, कृष्णदेव वाघमोडे, नागेश खिलारे, सुरेश शिंदे, कदीर शेख, राजाभाऊ आष्टूळ,बागवान यांच्यासह विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल असलेल्या महिला रुग्णभगिनींशी त्यांनी आपुलकीने संवाद साधला. यावेळी महिला रुग्णांनी रुग्णालयात पाण्याची सोय नसल्याचे सांगितले. रात्री हॉटेल आणि दुकाने बंद झाल्यानंतर पिण्याच्या पाण्यासाठी सकाळपर्यंत तिष्ठत बसावे लागत असल्याची बाब हतबल होऊन सांगितली. हे ऐकून खासदार प्रणितीताई शिंदे भावुक झाल्या. त्यांनी याबाबत तात्काळ उपायोजना करण्याच्या सूचना स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच खासदार फंडातून त्वरित वॉटर प्युरिफायर बसवून देण्याबाबत संबंधितांना सुचित केले.

यावेळी स्थानिक शिवसेना नगरसेवक सत्यवान देशमुख, नागेश खिलारे आणि अन्य सामाजिक कार्यकर्त्यांनी पोस्टमार्टम रूम पाहण्याची विनंती केली. यावेळी त्यांनी जिवंत माणसांना या ठिकाणी सोयी सुविधा मिळत नसतील तर मृत्यू पावलेल्यांना कशा मिळणार? असा सूचक सवाल त्यांनी उपस्थित केला.या रुग्णालयातील सोयी सुविधांबाबत वरिष्ठ प्रशासन उदासीन असून जिल्ह्यातील बऱ्याच शासकीय रुग्णालयांची हीच सुविधा असल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले. येत्या काही दिवसात होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्वांसमोर मांडणार असल्याचे आवर्जून नमूद केले.

## वात्रटिका

### सिंदूर

औकात तुझी काय
तरी वाटेला तू जातो...
युद्धाचे नाही बळ तरी
तू उगाच गरळ ओकतो...
राहून राहून खुमखुमी येते
कधी जास्त कधी थोडी...
कळून चुकले तुला कितीदा
आता पळता भुई थोडी...
उजाड केले भाळ लेकीचे
सिंदूर भांगातला पुसून...
तळतळाट त्याचाच तुला
सिंदूरानेच सांगितला ठासून...
फुसक्या बाजाराचा धनी
चिन्या, तुला माल खपवला...
हालत बघून तुझी आजची
तुर्कीचा भुई चक्कर झाला...
तुज्या तोंडचे पाणी पळाले
आता हाती येईल कटोरा...
फुकटचाच पण ऐक सल्ला
संधी आहे तोवर सुधारा..

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील पदवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. सदरील निरोप समारंभ कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सचिन फुगे हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. यांनतर महाविद्यालयातील विद्यार्थी आशिष पालवे, सोहम बोधले, प्रतीक्षा गुंड, आरती खुने, सायली सोनावणे, दर्शना शिंदे, प्रतिभा शिंदे, राधिका घुगे, श्रेया टकले, निकिता ठावरे आदींनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील त्यांचा जीवनप्रवास, जिव्हाळा व अनुभव व्यक्त करत महाविद्यालयातील सुखद आठवणींना उजाळा देऊन उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांत सहभाग नोंदवावा व आपले ईच्छित ध्येय साध्य करावे असा मौलिक सल्ला देखील दिला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रा. सायली बडेकर, प्रा. अंकिता पवार यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी करावा अश्या मनस्वी शुभेच्छा दिल्या.



प्राचार्य सागर महाजन यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांनप्रती त्यांचे अनुभव व जिव्हाळा व्यक्त केला. प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक चार वर्षांच्या कालावधीत शैक्षणिक तसेच कला, क्रीडा क्षेत्रात संपादित केलेल्या दैदीप्यमान याच्याबद्दल विशेष कौतुक केले. महाविद्यालय हे नेहमीच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढी सोबतच त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यास कार्यबद्ध असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ सचिन फुगे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या नैतिक मूल्यांची जपणूक आयुष्यभर करून एक चांगला नागरिक म्हणून स्वतःचे पर्यायाने महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. सदरील कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन महाविद्यालयाच्या द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नक्षत्रा कांबळे यांनी व्यक्त केले.

# अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात पक्ष संघटना वाढवू - अक्षय भांड

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सभासद नोंदणी सोलापूर जिल्ह्यात सुरू केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन गट पडल्यानंतर प्रथमच माळशिरस तालुक्यात सभासद नोंदणी ला सुरूवात झाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विस्कळीत झालेली घडी व सोलापूर जिल्ह्यात झालेली पक्षाची बिकट अवस्था या गोष्टी वर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे लक्ष ठेवून आसल्याचे मत राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी



माळशिरस येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आढावा बैठकीत व्यक्त करून सभासद नोंदणी ची माहीत दिली व सोलापूर जिल्ह्याच्या सभासद नोंदणीचा प्रारंभ माळशिरस तालुक्यापासुन सुरू करण्यात आला.यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य सुरेश आबा पालवे,तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, युवक तालुका अध्यक्ष अमित देशमुख,ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष सुनिल गोरे, ओबीसीचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय ढेकळे, राहुल ढेरे, सामाजिक न्याय विभागाचे दादा ढवळे, फोंडशिरसचे उपसरपंच दादा रणदिवे,माजी जि.प. सदस्य अशोक गायकवाड, अमोल बागार्डे, मंगेश निबाळकर, शरद रुपनवर व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंदी भाषेची सक्ती मागे घ्या
## माकप ची राज्यभर मागणी व निवेदने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठी भाषा बोलणाऱ्या नागरिकांचा प्रांत म्हणून भाषावार प्रांतरचनेच्या निकषानुसार संयुक्त महाराष्ट्राच्या झुंजार लढ्यानंतर महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. १०६ हुतात्म्यांनी यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. अनेकांनी हालअपेष्टा व तुरुंगवास भोगले. महाराष्ट्र हा मराठी भाषिकांचा प्रांत आहे. मराठी भाषा महाराष्ट्राच्या लोकजीवनाची व संस्कृतीची भाषा आहे. ही भाषा टिकावी व आणखी बहरावी यासाठी महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्राच्या जनतेने अधिक सजगपणाने काम करण्याची आवश्यकता आहे.

मात्र असे असताना महाराष्ट्र सरकारने नुकताच सुरुवातीला त्रैभाषिक धोरणानुसार मराठी प्रांतामध्ये हिंदी भाषा इयत्ता पहिलीपासून सक्तीची करण्याचा निर्णय घेतला. राज्यभरातून या निर्णयाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षासह अनेक पक्ष संघटनांनी व साहित्यिक, विचारवंतांनी विरोध केल्यानंतर हा निर्णय काही प्रमाणात मागे घेण्यात आला. मात्र असे करताना त्रैभाषिक धोरणांतर्गत तिसरी भाषा सक्तीची करत, मराठी शाळांमध्ये हिंदी भाषेचे शिक्षक उपलब्ध करून व हिंदी भाषेचीच पाठ्यपुस्तके शाळांमध्ये पोहोचवून प्रत्यक्षपणाने हिंदी सक्तीची नसताना सुद्धा सोय व उपलब्धता पाहता विद्यार्थी हिंदीचीच निवड करतील अशा प्रकारची परिस्थिती अत्यंत डावपेची पद्धतीने राज्य सरकारने निर्माण केली आहे.



आमचा हिंदीसह कोणत्याही भाषेला विरोध नाही. हिंदी किंवा इतर कोणत्याही भाषेबद्दल आमच्या मनामध्ये किंचितही द्वेषभावना नाही. किंबहुना सर्वच भाषांबद्दल मराठी जनतेच्या हृदयामध्ये प्रेमच आहे. मात्र लहान वयातील विद्यार्थ्यांना तीन-तीन भाषा शिकण्याची सक्ती केल्याने बालमनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून त्यांच्यावर अत्यंत वाईट परिणाम होईल असे तज्ञांचे मत आहे. ही पक्षाची भूमिका राज्य समिती सदस्य कॉ ॲड.अनिल वासम यांनी मांडली.

शुक्रवार दिनांक ९ मे पद्मभूषण शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यभर भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) च्या वतीने विविध जिल्हाधिकारी कार्यालय येथे हिंदी भाषेची सक्ती मागे घ्या ही प्रमुख मागणी घेऊन निवेदन देण्यात येत आहे त्या अनुषंगाने सोलापूर येथे कॉ किशोर मेहता यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाद्वारे मा. उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख यांना निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात पक्षाचे राज्य समिती सदस्य कॉ दत्ता चव्हाण, ॲड कॉ.अनिल वासम, बापू साबळे, लिंगव्वा सोलापूरे, दीपक निकंबे, अकील शेख, विजय हरसूरे, शहाबुद्दीन शेख, अरुण सामल, वसीम देशमुख,रफिक काझी आदींचा समावेश होता.

निवेदनात म्हटले आहे की, शिवाय हळूहळू एक भाषा एक देश या एकारलेपणाच्या धोरणाची अंमलबजावणी या माध्यमातून पुढे रेटली गेल्याने देशाच्या एकात्मतेवर व एकजुटीवरही या निर्णयाचा विपरीत परिणाम होईल.

एकीकडे अशाप्रकारे अप्रत्यक्षपणे का होईना हिंदी सक्तीची केली जात असताना दुसऱ्या बाजूला मात्र वेगवेगळ्या कारणांनी गाव खेड्यामध्ये आणि दुर्गम भागामध्ये असलेल्या मराठी शाळा पटसंख्या व इतर कारणे देत सरकार धडाधड बंद करत आहे. ग्रामीण भागातील श्रमिकांची मुले यामुळे शिक्षणापासून वंचित राहत आहेतच शिवाय मराठी भाषेवर सुद्धा याचा अत्यंत विपरीत परिणाम होत आहे.

भाषा कमजोर झाली की त्या भाषेवर आधारित संस्कृती कमजोर होत असते, हळूहळू नष्टप्राय होत असते. सरकारने त्यामुळेच मराठी भाषा वाचवण्यासाठी, मराठी प्रांत वाचवण्यासाठी, महाराष्ट्र वाचवण्यासाठी, माणुसकी, प्रेम आणि एकोप्यावर आधारित असलेली महाराष्ट्राची संस्कृती वाचवण्यासाठी आपल्या धोरणाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे.

# सीमेवर लढणाऱ्या सैनिकांसाठी उपरीत महाआरती

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** सीमेवर लढणार्या भारतीय जवानांना अधिक बळ मिळावे यासाठी उपरी (ता.पंढरपूर) येथील ग्रामस्थांनी रविवारी (ता.11) येथील ग्रामदैवत हनुमान मंदिरात महाआरती केली. दरम्यान दहशतवाद्यांना पोसणार्या पाकिस्तनाचा भारताने कायमचा बिमोड करावा अशी मागणी सैनिकांच्या कुटुंबियांनी केली. काश्मिरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. मागील काही दिवसांपासून भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. त्यातूनच युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी भारतीय सीमेवर लढणाऱ्या भारतीय



जवानांना अधिक बळ मिळावे, शिवाय ते सुरक्षित राहावेत यासाठी येथील ग्रामस्थांनी एकत्रित येथ येथील जागृत हनुमानासह,गणपती आणि विठ्ठलाला ही साकडे घातले.

महाआरतीमध्ये गावातील तरुण आणि सैनिकांचे कुटुंबिय सहभागी झाले होते. येथील मंदिराचे पुजारी सुधाकर गुरव यांच्या हस्ते सकाळी हनुमान मंदिरात महाआरती करण्यात आली. महाआरती नंतर भारतीय जनावांच्या धैर्याचे कौतुक करत जय जवान जय किसान, भारत माता की जय अशा घोषणा दिल्या. यावेळी पाकिस्तानच्या या कृत्याचा निषेध ही नोंदवला. हल्ल्यात ठार झालेल्या पर्यटक, नागरिक आणि सैनिकांना आदरांजली वाहण्यात आली.

पाकिस्तान सतत दहशतवाद्यांना पुढे करुन भारतातील नागरिकांवर हल्ले करत आहेत. भारता विरोधात सातत्याने कारवाया करणाऱ्या पाकिस्तानाचा भारताने कायमचा बिमोड करावी अशी मागणी ही यावेळी सैनिकांच्या कुटुंबियांनी केली. येथील अनेक तरुण भारतीय सैन्यात कार्यकरत आहेत. त्यांच्यासह सीमेवर लढणार्या जवानांसाठी महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती सुधाकर गुरव यांनी दिली. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक साहेबराव नागणे, ज्ञानेश्वर नागणे, कैलास नागणे, दत्तात्रय मोहिते,सतीश नागणे, विक्रांत जगदाळे, सुशांत जगदाळे, बाळासाहेब नागणे,संभाजी नागणे, भारत नागणे, प्रवीण नागणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फोन क्र.(०२१८६)२२३२५३,२२३०१३,२२३१८७ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६

ई मेल:- comcpandharpur@gmail.com

जा.क्रं./पंनपं/अग्नि/२३६१/२०२५ दिनांक:०९/०५/२०२५

**अग्निशमन विभागा करिता दरपत्रके देणेबाबत**

मुख्याधिकारी पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर यांच्याकडून नगरपरिषद निधी / वैशिष्ट्पूर्ण निधी / १५ वा वित्त आयोग / इतर अनुज्ञेय निधी / महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत एक अग्निशमन वाहन (चेसीससह) व साहित्य पुरवठा करणे करिता इच्छुक ठेकेदार / पुरवठादार यांना कळविण्यात येते की, अग्निशमन आणिबाणीसेवा विभागासाठी आवश्यक साहित्याचे दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर साहित्य/उपकरण यांच्या सविस्तर तपशील अग्निशमन विभागाकडे उपलब्ध आहे.

तरी पुरवठादारांनी दि.१२/०५/२०२५ ते दि. १९/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत नगरपरिषदेच्या आवक-जावक बारनिशीमध्ये जमा करावीत. साहित्याचे दर हे सर्व करांसहीत देण्याचे आहेत. दरपत्रक सादर केले म्हणजे साहित्य पुरवठा करण्यास पात्र आहात असे समजण्यात येऊ नये. तसेच मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. प्रशांत जाधव)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**

## Classified - छोटी जाहीरात

### विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

# खर्डीत नृसिंह जयंती साजरी



**खर्डी (कटूसत्य वृत्त):-** विष्णूच्या दशावतारातील चौथा अवतार नृसिंह अवतार.पंढरपूर तालुक्यतील खर्डी येथे नृसिंह जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली. शेकडो वर्षांची परंपरा जपत गावातील कुलकर्णी वाडा, हिलाळपार, येथील मूर्तीवर सकाळी पवमान अभिषेक करण्यात आला. दुपारी भजन करून सायंकाळी सात वाजून तीन मिनिटांनी फुले वाहण्यात आली. जन्मांचा अभंग आणि कडकडला स्तंभ गडगडले गगन या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी गायक सुशील खर्डीकर, बाळासाहेब परिचारक, बापू केसकर, देविदास परिचारक, रामदास रोंगे, राजाभाऊ केसकर, सुरेश पंढरी, नंदकुमार कुलकर्णी, हरिभाऊ कुलकर्णी समस्त (केसकर) कुलकर्णी परिवार तर कुंभार वाडयात भिकाजी कुंभार, गणेश कुंभार, खंडू कुंभार, सुनील कुंभार, रामदास कुंभार आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते. रविवार असल्याने नाभिक समाजाने दुपारी दोन नंतर व्यवसाय थांबवून जयंती व प्रसादाचे हिलाळ पार येथे आयोजन केले होते. समाधान हिलाळ, दत्ता हिलाळ, प्रशांत हिलाळ,आबा हिलाळ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. जयंती दिवशी काही ठिकाणी उपवास पाळण्यात आला तर प्रथेनुसार काही ठिकाणी प्रासादिक भोजनाचे भात आमटी, शिरा व्यंजने आयोजन करण्यात आले. तर कुलकर्णी वाडा येथेही प्रसादाचे दुसरे दिवशी नेवेद्य नंतर आयोजन असते. गावात सर्वत्र धार्मिक वातवरण होते. कुठेही स्पिकर गोंधळ न करता अत्यंत शांततेत नृसिंह जयंती पार पडली.


## CHANGE IN NAME

My Correct Name is Obaidullah Saleem Khateeb which is mentioned in my Birth Certificate, Education Documents & Voter Card. My old name was Obaidullah Salim Khateeb which is mentioned in my Adhar Card & Pan Card

That, the above both names are of the one & the same person & it's me

Affidavit Dated - 10/05/2025

## कटूसत्य शब्दकोडे



**आडवे शब्द :** १) एक प्रख्यात लेखिका
७) एक म्हण-** तेथे माती
९) गंध, परिमळ १०) सब्र का ** मिठा होता है
११) याच्यावरून रेल्वे धावते १२) जून नंतरचा महिना
१३) एक मुळ्याप्रमाणे कंदभाजी १५) दया, कृतज्ञतेची भावना
१६) श्रावण (हिंदीत) १७) भिंत (हिंदीत)
१९) गुळाचा मोठा उभट गोलाकार तुकडा
२१) अकबराच्या दरबारातील गायक
२३) सत्तरच्या दशकातील हिंदी सिनेअभिनेत्री- आशा *** २४) तारा (हिंदीत)
२५) वस्तूचा भाव, प्रत्येक २६) विहिरीतून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन
२८) ढग (हिंदीत) ३१) चालू दिवस, एक हिंदी वृत्तवाहिनी-** तक ३२) रनू उलट लिहा ३३) स्वस्तच्या विरूध्दार्थी ३५) पंधरा गुणिले चार ३७) पगार
३८) पतीची दुसरी बायको ३९) मध गोळा करणारी मधुमक्षिका
४१) उद्या (हिंदीत)
४२) एक शाकाहारी जेवण-*** भात ४४) तोंड आल्यावर ही पावडर लावतात
४७) पुण्यातील एक इतिहासकालीन वास्तू ४८) दहा गुणिले सात

**उभे शब्द :** १) शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका करणारा अभिनेता २) जुनाच्या विरूध्दार्थी ३) सांगली जिल्ह्यातील एक तालुका ४) प्रवास (हिंदीत) ५) नांगर (हिंदीत) ६) त्वरेने, तातडीने ७) एक प्रख्यात मराठी लेखिका ८) संक्रांतीदिवशी हे वाटतात- **गुळ १४) बिहारमधील एक राजकीय पक्ष १६) दिलीपकुमार यांची पत्नी, एक अभिनेत्री १७) एक म्हण-मनी वसे ते स्वप्नी ** १८) श्रीरामाने या सेनेच्या मदतीने लंकेवर विजय मिळवला २०) एक वाद्य २२) मादीच्या विरूध्दार्थी शब्द २३) बसण्यासाठी बनविलेली लाकडी फळी २७) एक म्हण-आपला ** जगन्नाथ, कर २९) अस्वलांचे खेळ दाखविणारा ३०) पाच दुणे ३१) स्मृती, याद (मराठीत) ३३) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा ३४) याच्या पिठापासून चपाती बनते ३५) मुलीचा सासरी होणारा छळ ३६) तपास, मागोवा ३९) एक अभिनेता-*** कोठारे ४०) एक भक्तीगीत-केशवा *** तुझ्या नावात रे गोडवा ४२) नशीबवान (इंग्रजीत) ४४) याच्यावर भाकरी भाजतात ४५) कामावरून घेतलेली सुट्टी ४६) बे दुणे

## सुडोकु - 246

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 1 | 2 | 9 | 6 | | | |
| 3 | | | | 8 | 1 | 7 | | 6 |
| 2 | | | | | | | 9 | |
| 1 | | 2 | | 6 | 5 | 4 | 7 | 9 |
| | | | 1 | | 9 | | 3 | |
| 5 | 9 | | 3 | | | | 6 | 2 |
| 4 | | | | | | | 1 | 3 |
| 9 | 1 | | | | | 6 | 8 | 7 |
| | 8 | | | | 7 | | 5 | |

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये 877 प्रकरणे निकाली



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** तालुका विधी सेवा समितीच्यावतीने जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे दि.10 मे 2025 रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये 877 प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये एकूण 73 कोटी 25 लाख 64 हजार 902 रुपयांची तडजोड झाली असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. एन.सुरवसे यांनी दिली. रष्ट्रीय लोकअदालतीत 5 वर्षावरील 797 जुनी प्रकरणे निकाली काढण्यात असून, या लोकअदालतीसाठी एकुण 7 पॅनलची व 1 नियमित न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली होती. या पॅनलमध्ये जिल्हा न्यायाधीश एस बी देसाई, न्यायाधीश ए. ए. खंडाळे, न्यायाधीश श्रीमती एस.एस. पाखले, न्यायाधीश श्रीमती एस. एस.राऊळ, न्यायाधीश एन. एस बुद्रुक, न्यायाधीश श्रीमती के.जे.खोमणे, न्यायाधीश पी.पी बागुल व न्यायाधीश श्रीमती पी. आर पाटील यांनी काम पाहिले सदरची लोकअदालत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश श्री. डी. एन. सुरवसे, सह दिवाणी न्यायाधीश ए. ए. खंडाळे, दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस.एस. पाखले यांनी वेळोवेळी बैठका घेवुन, पाठपुरावा करुन संपन्न केली. या लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार न्यालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाची चाचणी येत्या बुधवारी होणार

**सोलापूर, (कटुसत्य वृत्त):-** उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम केवळ ७५ मीटर राहिले असून ते दोन दिवसात पूर्ण होईल. त्यानंतर येत्या बुधवारी या जलवाहिनी कामाची चाचणी करण्यात येणार आहे. दरम्यान, शहरात हॉकर्स झोन निश्चित करून पथविक्रेत्यांना ओळखपत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे एकूण ११० किलोमीटरपैकी शेवटचे केवळ ७५ मीटरचे काम शिल्लक आहे, तेही येत्या दोन दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे. तशा स्पष्ट सूचना संबंधितांना दिल्या आहेत. त्यानंतर येत्या बुधवारी जलवाहिनी चाचणीचे काम करण्यात येणार आहे. मोडनिंब येथील हे काम संपले आहे. शेतकऱ्यांच्या अडथळ्यामुळे अडचण आली होती. आता काम सुरू आहे, असे आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी सांगितले.

सोलापूर शहरातील पाणीपुरवठा संदभार्तील ८८२ कोटींच्या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यातील ३०० कोटींच्या कामांचा नवा आराखडा तयार करण्यात येत आहे. ती प्रक्रिया सुरू केली आहे. महिनाभरात हा आराखडा तयार होईल. पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. कोणत्या तारखेला किती पाणी येईल. कुठून येईल याचा आढावा यामध्ये घेतला जात आहे. एका विभागात पाणी सोडले तर



दुसऱ्या टप्प्यातील पाणी इतर विभागात जाऊ नये. वॉल्व्ह बंद केला की पाणी पुढे जाऊ नये यासंदर्भातही नियोजन करण्यात येत आहे. सर्व कनिष्ठ अभियंता यासंदर्भात नियोजन करत आहेत. टेंडर झाले आहे. आराखड्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, असेही डॉ. ओम्बासे यांनी सांगितले.

महापालिकेतील बोगस बांधकाम परवाना प्रकरणातील २७ जणांची सुनावणी पूर्ण झाली आहे. या सर्व बांधकाम धारकांना महापालिकेकडे बांधकाम परवान्यासाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन केले होते.

त्यापैकी केवळ सहा जणांनी ऑनलाइन अर्ज भरले आहेत. या ऑनलाइन अर्जावर महापालिकेचे कनिष्ठ अभियंता पुढील कार्यवाही करणार आहेत. संबंधित जागेवर प्रत्यक्ष जाऊन पाहणी आणि मोजणी करण्यात येणार आहे. नियमानुसार बांधकाम केले आहे की नाही याची तपासणी करून फोटोही घेण्यात येतील. नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

नियमानुसार बांधकाम नसल्यास आवश्यकतेनुसार पाडकाम करण्यात येईल. दरम्यान, या प्रकरणातील ज्यांनी ऑनलाइन अर्ज भरले नाहीत त्यांना येत्या आठ दिवसात ऑनलाइन अर्ज प्रक्रिया करावी, अन्यथा पाडकाम करण्यात येईल, अशी नोटीस बजावण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे संबंधितांना संधी दिली जात आहे. संधी देऊनही प्रतिसाद दिला नाही तर पाडकाम करावेच लागणार आहे. ते पाडावे लागणारच आहे, असेही यावेळी आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### रस्त्यावरील वाढते अतिक्रमण; लवकरच हॉकर्स झोन निश्चित

सोलापूर शहरात रस्त्याच्या कडेला फूटपाथवर अतिक्रमण करून व्यवसाय करणा-यांची संख्या वाढली आहे. यामुळे वाहतुकीस अडथळा होत आहे. या सदर्भात विचारले असता रस्त्यावरील वाढते अतिक्रमण पाहता लवकरच हॉकर्स झोन जाहीर करण्यात येणार आहेत. सोलापूर शहरात सुमारे ६ हजार पथविक्रेते आहेत. या संदर्भात मागील आठवड्यात बैठक झाली. पथविक्रेता समिती गठीत करण्यात आली आहे. राहिलेले प्रतिनिधीही नेमले आहेत. रस्त्यावर अतिक्रमण वाढू नये यासाठी हॉकर्स झोन करण्यात येणार आहेत. प्रत्येक पथविक्रेत्यांना ओळखपत्र दिले जाईल. पाच बाय चार फूट इतकी जागा निश्चित केली जाईल. जागा मार्किंग करून जिओ टॅग करण्यात येणार आहे. दोन महिन्यानंतरही प्रक्रिया पार पाडली जाईल, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### पनाश टॉवरप्रकरणी चौकशी अहवाल लवकरच

विजापूर रोडवरील बहुचर्चित पनाश टॉवर बांधकामप्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी ही चौकशी केली आहे. दरम्यान, या समितीमध्ये नगर रचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर यांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यांच्याकडून अहवाल तयार करण्यात येत आहे. लवकरच तो सादर होईल, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यानी सांगितले.

### शासन अनुदान खर्चाचे ऑडिट करण्याच्या सूचना

सोलापूर महापालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून विविध प्रकारचे अनुदान मिळते. सोलापूर महापालिकेत त्याचे प्री ऑडिट होते. मात्र, पोस्ट ऑडिट होत नाही. किती अनुदान आले ? किती खर्च झाला ? शिल्लक किती ? या संदर्भात ऑडिट होणे आवश्यक आहे. या संदर्भात विचारले असता अनुदान जमासाठी फार्म १३ तर खचार्साठी फार्म १४ भरण्यात येतो. त्यानुसार मागील वषार्चे ऑडिट करून घ्यावे, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना आयुक्तांनी दिल्या आहेत.

# बार्शीच्या वृक्ष संवर्धन समितीला राज्यस्तरीय नेचर केअर पुरस्कार



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** नेचर केअर फटीर्लायझर यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय नेचर क्लियर पुरस्कार बार्शीच्या वृक्ष संवर्धन समितीला देण्यात आला. विटा (जिल्हा सांगली) येथे संपन्न झालेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. वृक्ष संवर्धन समितीने आजपर्यंत केलेल्या वृक्ष लागवड आणि संवर्धन या कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.रू. एकावन्न हजार आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या पुरस्कारासाठी राज्यभरातून 80 नामांकने आली होती त्यातून रक्त संवर्धन समिती बार्शीची निवड करण्यात आली. या पुरस्कार वितरण सोहळ्याला सेंद्रिय शेती अभ्यासक कृषी भूषण राजेंद्र भट, सिने अभिनेत्री सायली संजीव, नेचर फटीर्लायझर चे अध्यक्ष जयंत बर्वे, कार्यकारी संचालक जयदेव बर्वे, संचालिका कामाक्षी बर्वे, पर्यावरण अभ्यासक आशिष वेले, पुरस्कार निवड समितीचे अरुण नाईक आदी मान्यवर उपस्थित होते. वृक्ष संवर्धन समितीने गेल्या सहा वर्षापासून अविरतपणे सकाळी दोन तास श्रमदान करून साधारण पंचवीस हजार झाडे लावून ती जगवली आहेत. विटा जिल्हा सांगली येथे झालेल्या या कार्यक्रमाला वृक्ष संवर्धन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खाजगी शाळेतील 58 अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खाजगी अल्पसंख्यांक प्राथमिक शाळेतील ५८ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन जिल्हा परिषद शाळांमध्ये करण्यात आले.समायोजनासाठी खाजगी प्राथमिक शाळा संयुक्त कृती समितीने केलेला पाठपुराव्याला यश आल्याची माहीती डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली. सन २०२३—२४ च्या संचमान्यतेनुसार खाजगी अल्पसंख्यांक शाळेतील मराठी,कन्नड व उर्दु माध्यमातील ५८ शिक्षक अतिरिक्त ठरले होते.या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन जिल्हा परिषद शाळांमध्ये करण्यात यावे.या मागणीसाठी शिक्षण उपसंचालक हारुन अत्तार,मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला होता.डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, राज्य शिक्षक सेना, युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेच्या संयुक्त कृती समितीच्यावतीने पाठपुरावा करण्यात आला होता. प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी या शिक्षकांचे समायोजन तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळांमध्ये करण्यात आले.यासाठी राज्य शिक्षक सेनेचे पश्चिम विभागीय अध्यक्ष सुनील जगताप, आप्पाराव इटेकर, आप्पासाहेब पाटील व अ.गफुर अरब, सचिन चौधरी यांनी प्रयत्न केले.

कन्नड माध्यमातील शिक्षक २०१२ पासुन अतिरिक्त ठरले होते.मागील १३ वषार्पासुन त्यांच्या समायोजनाची प्रक्रीया प्रलंबित होती.त्यांचे समायोजन करुन शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी मागील १३ वषार्पासुन प्रलंबित प्रश्न मार्गी लावला आहे.त्यामुळे शिक्षकांनी त्यांचे आभार मानले.

# चालत्या बसने घेतला पेट; १५ प्रवाशी सुखरूप

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** पुणे-सोलापूर महामार्गावर चालू खाजगी प्रवासी वातानुकूलित बसने पेट घेतल्याने थरार पहावयास मिळाला.माढा तालुक्यातील वेणेगाव हद्दीत एलपीजी गॅस पंपासमोर शनिवारी (दि.१० रोजी) सकाळी ७ वा.सुमारास ही दुर्घटना घडली असून सर्व प्रवासी सुखरूप आहेत. बेस्ट एक्सप्रेस ही वातानुकूलित बस (क्र.एन.एल. ०१ बी-१८२४) ही हैदराबाद कडून मुंबईस निघाली होती.

चालू बसने प्रवासी झोपेत असताना अचानक पेट घेतला.बस पेटल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत बस रस्त्याच्या बाजूला थांबविली.





यामुळे सर्व प्रवाशी सुखरूप खाली उतरवले.

त्यानंतर कुडुर्वाडी नगरपरिषदेच्या अग्निशमन यंत्रणेने बस विझविली.तो पर्यँत बस संपूर्ण जळून खाक झाली होती.

या घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार,सपोनी गिरीष जोग, हवालदार विशाल शिंदे,मोडनिंब येथील ग्रस्ती पथकाचे पोसई बालाजी साळुंके, वैद्यकीय पथक हेही हजर झाले होते.सुमारे दीड तासानंतर आग विझवण्यास यश मिळाले.

काही काळ वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आली.

या दुर्घटनेत जीवित हानी झालेली नसली तरी प्रवाशांचे डीकी मधील साहित्य जाळून खाक झाले.ही बस अब्दुल इम्तियाज हा चालक (रा.मध्यपूर हैद्राबाद) हा घेऊन जात होता.त्याने टेंभुर्णी पोलीस ठाण्यात खबर दिली आहे.

# रेल्वे स्थानकावर वाढवली सुरक्षा यंत्रणा

**सोलापूर, (कटुसत्य वृत्त):-** भारत-पाकिस्तान यांच्यात सुरू असलेल्या युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर स्थानकावर सुरक्षा यंत्रणा वाढवण्यात आली असून संशयित वस्तू आणि प्रवाशांवर रेल्वे सुरक्षा बल, लोहमार्ग पोलिसांची करडी नजर असल्याचे पोलीस निरीक्षक संतोष गायकवाड यांनी सांगितले.

देशातील प्रमुख रेल्वे स्थानकांपैकी एक असलेल्या सोलापूर रेल्वे स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. दक्षिणेला जोडणारा महत्त्वाचा दुवा असलेल्या सोलापूर रेल्वे स्थानकावर सुरक्षा यंत्रणा वाढवण्यात आली आहे. पाकिस्तानकडून गुरुवारी ड्रोनद्वारे भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. परंतु भारतीय वायुदलाने हवेतच त्यांचे ड्रोन नष्ट करून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे. सीमेपलीकडून भारतात अतिरेकी घुसविण्याचा नापाक प्रयत्नही पाकिस्तानाकडून होत आहे. त्यामुळे देशभरातील महत्त्वाचे रेल्वे स्थानक, विमानतळ, प्रमुख शैक्षणिक संस्था आणि सैन्य दलाचे केंद्र आदी परिसरात अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्यात आली आहे.

तीन दिवसांपूर्वी मध्य रेल्वेने आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी मुंबईतील प्रतिष्ठित छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे एक व्यापक मॉक ड्रिलचे यशस्वीरीत्या आयोजित केले होते. त्यातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे हवाई हल्ल्याचा सायरन सक्रिय करणे, त्यानंतर प्रवासी व नागरिक खबरदारीचे उपाय करून त्यांची सुरक्षितता कशी करू शकतात याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले, ज्यामध्ये अशा सूचनांदरम्यान धोका कमी करण्यासाठी जमिनीवर झोपण्याची स्थिती घेण्याची योग्य पध्दत समाविष्ट होती. शिवाय, मॉक ड्रिलमध्ये जखमी व्यक्तीला स्ट्रेचरशिवाय सुरक्षितपणे उचलून नेण्याचे आणि काळजीपूर्वक नेण्याचे व्यावहारिक प्रात्यक्षिक दाखवण्यात आले, जेणेकरून पीडितांना जलद आणि सुरक्षितपणे जवळच्या रुग्णवाहिका आणि वैद्यकीय सुविधेत पोहोचवता येईल. आणखी एक महत्त्वाची परिस्थिती ज्यावर लक्ष केंद्रित केले गेले ते म्हणजे गंभीर रक्तस्राव व्यवस्थापन.

गंभीर दुखापतींमध्ये रक्तस्राव कमी करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांनी जीवनरक्षक तंत्रांचे प्रात्यक्षिक दाखविले.

या सरावात अग्निसुरक्षा प्रोटोकॉल देखील समाविष्ट करण्यात आले. अग्निशामक यंत्र नसताना आगीच्या आपत्कालीन परिस्थिती कशा हाताळायच्या, आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पर्यायी पध्दती कशा वापरायच्या याचे प्रात्यक्षिक सहभागींनी दाखविले. याव्यतिरिक्त, विविध प्रकारच्या आगींना सामोरे जाण्यासाठी अग्निशामक यंत्रांचे योग्य ऑपरेशन दाखवण्यात आले, ज्यामुळे रेल्वे कर्मचारी आणि प्रवासी दोघेही प्रभावीपणे प्रतिसाद देण्याकरिता सुसज्ज आहेत याची खात्री झाली.

# डॉ. आडकर कुटूबियांच्या विरोधात जागा बळकावल्याची माढा पोलिसांत तक्रार

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढ्यातील डॉक्टर राजुकमार आडकर कुटूबियांच्या विरोधात प्रशासकीय अधिकाऱ्याने जागा बळकावल्याची माढा पोलिसांत तक्रार दिली आहे.

माढा पोलिसांना कैलास शेटे यांनी दिलेल्या लेखी तक्रारी अर्जात म्हटले आहे की, माढा शहराच्या हद्दीत माढा कुर्डूवाडी रोडवर गट नं. ९१७ ही माझ्या मालकीची जमीन आहे. माझ्या जमिनीच्या शेजारी जमीन असलेले डॉक्टर व्यवसाय असलेले राजकुमार आडकर यांनी दहशत निर्माण करुन माझ्या शेतीच्या जागेत बेकायदेशीर रित्या झाडांची लागवड केलेली असुन रस्ता निर्माण केलेला आहे.

यास्तव सदर जमिनीची सरकारी मोजणी शासकिय मोजणी अधिकारी श्री. वडकर यांचेकडून मी केली व शासकिय मोजणी दरम्यान हदद कायम करताना ही बाब सत्य दिसून आली.

शासकिय मोजणी अधिकारी यांनी दि. ९.५.२०२५ रोजी ज्या हददी सांगीतल्या त्या कायम करण्यासाठी राजकुमार आडकर यांच्या पत्नी व मेव्हणे व मुलगा यांनी प्रत्यक्ष जागेवर येऊन अडथळा निर्माण केला तसेच दमदाटी केली. तसेच शासकिय मोजणीदार यांना देखील धमकावले आहे.माझ्या जीवितास डॉ. राजकुमार आडकर व त्यांचे नातेवाईकांपासून धोका आहे.तरी त्यांचेवर योग्य ती कायदेशिर कारवाई करण्याची मागणी लेखि तक्रारी अर्जात केली आहे.या प्रशासकीय अधिकायार्ने डॉक्टर आडकर यांच्या विरोधात केलेल्या लेखी तक्रारी अर्जावर काय कारवाई होणार हे पहावं लागणार आहे.अर्जाच्या प्रती पोलिस अधिक्षक यांच्यासह अन्य वरिष्ठांना देखील पाठवण्यात आल्या आहेत.

कैलास शेटे व निलकंठ शेटे या बंधुनी माझी भेट घेऊन माझ्याकडे डॉक्टर आडकर यांच्या विषयी जमीन बळकावल्या प्रश्नी लेखी तक्रारी अर्ज दिला आहे. दोन्ही बाजु तपासून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**– नेताजी बंडगर,** सपोनि माढा पोलिस स्टेशन

श्री.शेटे यांनी केलेली मोजणी मला मान्य नसुन भुमी अभिलेख कार्यालयास मी मोजणी मान्य नसल्याचे पत्र दिले आहे.माझे पती डॉ.राजकुमार हे परगावी असल्याने मी मोजणिच्या ठिकाणी उपस्थित होते.शेटे बंधु यांनी देखील मला चुकीचे शब्द वापरले आहेत.

**– डॉ.अनिता आडकर,** माढा

# शेतकऱ्यांवर संकट, कांद्याच्या दरात मोठी घसरण, निर्यात पूर्णपणे ठप्प

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** अवकाळी पाऊस आणि गारपीटमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांसमोर शेतमालाच्या दराचे संकट आले आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या दरात मोठी घसरण होत आहे. त्यात भारत आणि पाकिस्तान दरम्यान निर्माण झालेल्या संकटामुळे भर पडली आहे.

आता शेतकऱ्यांचा कांदा हजार रुपयांपर्यंत घसरला आहे. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भरून निघणे कठीण झाले आहे. आता नाफेडकडून सुरु होणाऱ्या कांदा खरेदीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

नाशिकमधील लासलगाव बाजार समितीत कांद्याचे दर गडगडले असून शेतकऱ्यांवर संकट आले आहे. कांदा 1 हजार रुपये क्विंटलपर्यंत घसरला आहे. बाजार समितीमध्ये कांद्याची आवक वाढली आहे. दर घसरल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. भारत पाकिस्तान दरम्यान युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यातच भारताने पाकिस्तानसोबत होणारी निर्यात बंद केली. त्यामुळे कांद्याचे दर घसरले. तसेच बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे कांदा नियार्तीत घट झाली आहे. तसेच बांगलादेशात 30 टक्क्यांनी अधिक उत्पादन झाले आहे.

नाफेड एनसीसीएफ यांनी अद्याप कांदा खरेदी सुरु झाली नाही. नाफेड आणि एनसीसीएफकडून कांदा कधी सुरु होते, त्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. कांद्याची आवक जास्त आणि बाजारात कमी मागणी अशी परिस्थिती सध्या आहे. देशांतर्गत कांदाचा पुरवठा वाढल्याने थेट कांदा दरावर परिणाम आहे. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजारात उन्हाळी कांद्याला 1151 रुपये दर मिळाला. नाशिक बाजार समितीत हा दर 900 रुपये होता. येवला बाजार समितीत केवळ 851 रुपये दर मिळाला. मनमाड, पिंपळगाव बसवंत बाजारात 1100 रुपये कांद्याचा दर राहिला.

# आई-वडिलांचे प्रोत्साहन, रोज दहा तास अभ्यासाचे यश
# वैष्णवी गायकवाड, परीस गायकवाडने मिळवले यश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असतानाच माझ्या वडिलांनी मला क्लास वन अधिकारी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. प्रोत्साहनाला बळ देण्यासाठी सोबत आई होतीच. दोघांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रोज सलग दहा दहा तास अभ्यास केला. यामुळेच राज्य लोकसेवा आयोगाच्या स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळाले, अशी प्रांजळ प्रतिक्रिया वैष्णवी गायकवाड हिने व्यक्त केली.





स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यात वैष्णवी ही राज्यात पाचवी तसेच मुलींमध्ये राज्यात पहिली आली आहे. एमपीएससीच्या वेबसाइटवर निकाल पाहताच वैष्णवीच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. शिक्षक असलेल्या आपल्या आई-वडिलांच्या पाया पडत दोघांचेही तिने आभार मानले.

वैष्णवीचे प्राथमिक शिक्षण नुमती प्राथमिक विद्यालयात झाले. दमाणी प्रशालेत तिचे माध्यमिक तसेच ऑर्किड महाविद्यालयात तिने स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. अधिक माहिती देताना तिचे वडील राम गायकवाड यांनी सांगितले, माझी मुलगी अधिकारी व्हावी, ही माझी इच्छा होती. प्रशासनात राहून सेवा करणे म्हणजे देशसेवाच ना. तिच्या मेहनतीने तिला लोकसेवा करण्याची संधी मिळाली आहे.

दरम्यान, नोकरी सांभाळत अभ्यास करणे खूप अवघड होते. परंतु मला क्लास वन अधिकारी व्हायचे होते. त्यादृष्टीने तयारी केली. अभ्यासाचा आराखडा बनवला. यात आई वडिलांची मदत मिळाली, असे राज्यातून दुसरा आलेला परीस गायकवाड याने लोकमतला सांगितले. परीस हा सध्या सोलापूरच्या राष्ट्रीय महामार्ग विभागात शाखा अभियंता म्हणून कार्यरत आहे.

नि.७

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि.कि.अर्ज नं.१५/२०२५

**मोहोळ येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो।, यांचे कोर्टात**

१) चेतना कबीरसाहेब सरवदे, वय - ४० वर्षे, धंदा-मजुरी, २) अलोक कबीरसाहेब सरवदे, वय-२० वर्षे, धंदा-शिक्षण, ३) अमिताभ कबीरदास सरवदे, चय- १९ वर्षे, धंदा-शिक्षण, सर्व रा. नजिकपिंपरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. हल्ली सर्व रा. प्रेम नगर मारुती मंदीराजवळ, मार्केट यार्ड रोड, पुणे शहर, जि.पुणे. ४११०३७. } **अर्जदार**

**विरूध्द**

कोणी नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.१ व २ चे वडिल मयत कबीरसाहेब रमेश सरवदे यांचे नावे असलेली समाईकात अविभक्त हिश्श्याची मौजे नजिकपिंपरी ता.मोहोळ, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ४०७/२/अ ० हे. २० आर आकार ० रु.१५ पैसे या मिळकतीस त्यांचे कायदेशीर वारस अर्जदार नं.१ ते ३ यांच्या नावाची नोंद दाखल करण्यासाठी हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेसाठी या मे. कोर्टात वरील प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वरील मागणी बाबत जर कोणाची काही हरकत/आक्षेप असल्यास त्यांनी सदर अर्जाचे कामी या मे. कोर्टात सदरचे प्रसिध्दीकरण झालेपासून ३० दिवसाचे आत स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वकिलामार्फत नेमलेली पुढील ता.२३/०६/२०२५ रोजी हजर होवुन म्हणणे सादर करावे, जर मुदतीत कोणाची काही हरकत, न आल्यास सदर अर्जाचे कामी पुढील योग्य ते आदेश केले जातील, यांची नोंद घ्यावी. जाहिर प्रसिध्दीकरण केले असे ता. ०९/०५/२०२५.

**व. लिपीक**
**सि.ज.ज्यु.डि.मोहोळ**

शिक्का

**सहा,अधिक्षक**
**सि.ज.ज्यु.डि.मोहोळ**